आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
१३ मार्च २०२६ - शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- स्वयंपाकाचा गॅस आणि इतर पेट्रोलियम उत्पादनांचा काटकसरीने वापर करावा असं केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाचं आवाहन

- प्रधानमंत्र्यांच्या हस्ते आज शेतकरी सन्मान निधी योजनेच्या २२ व्या हप्त्याचं वितरण

- घरगुती एलपीजी गॅस सिलिंडरच्या पुरवठ्यात अडथळे येऊ नयेत, यासाठी राज्यशासन जिल्हास्तरावर विशेष समित्या स्थापन करणार

- पूर्वप्राथमिक शाळा प्रवेशासाठी प्रवेश परीक्षा घेऊ नये यासाठी राज्यसरकार नियम करणार

**आणि**

- राज्यात येत्या १७ ते २० मार्च दरम्यान अवकाळी पावसाची शक्यता

**<><><><>**

पश्चिम आशियातल्या संघर्षग्रस्त परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर, पेट्रोलियम उत्पादनांची संभाव्य टंचाई लक्षात घेता, नागरिकांनी स्वयंपाकाचा गॅस आणि इतर पेट्रोलियम उत्पादनांचा काटकसरीने वापर करावा असं आवाहन पेट्रोलियम आणि नैसर्गिक गॅस मंत्रालयानं केलं आहे. याबाबत जारी केलेल्या अधिसूचनेनुसार, देशात सध्या स्वयंपाकाचा गॅस, पेट्रोल आणि डिझेलचा पुरेसा साठा असून, पुरेसा राखीव साठा उपलब्ध आहे.

**<><><><>**

पश्चिम आशियातली संघर्ष स्थिती आणि त्यामुळे देशात एलपीजी पुरवठ्यावर झालेला परिणाम या मुद्द्यांवर विरोधकांनी गदारोळ केल्यामुळे लोकसभेचं कामकाज आधी १२ वाजेपर्यंत आणि नंतर २ वाजेपर्यंत तहकूब करावं लागलं.

विरोधी पक्ष नेता राहुल गांधी जनतेच्या समस्या समजून घ्यायला नकार देत असल्याचा आरोप संसदीय कार्य मंत्री किरेन रिजिजू यांनी केला.

सभागृहात कामकाज सुरू झाल्यानंतर दुसऱ्या टप्प्यातल्या पुरवणी मागण्यांवरच्या चर्चेला अर्थमंत्री निर्मला सीतारामन उत्तर देत आहेत.

**<><><><>**

भारतीय रेल्वेने वक्तशीर सेवा देण्यात ७७ टक्के यश मिळवलं असून रेल्वेच्या २४ विभागांमधे वक्तशीरपणाचं उद्दिष्ट ९० टक्के पर्यंत साध्य झालं आहे. रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज राज्यसभेत एका प्रश्नाच्या उत्तरात ही माहिती दिली. अद्ययावत तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापरातून रेल्वेच्या वेळापत्रकातल्या त्रुटी दूर करण्यात येत आहेत, असं ते म्हणाले. देखभाल दुरुस्तीसाठी जपानी पद्धतीने २६ आठवडे आगाऊ नियोजन केलं जातं असं त्यांनी सांगितलं.

विरोधकांच्या गदारोळामुळे राज्यसभेचं कामकाजही दुपारी २ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज आसाममधे गुवाहाटी इथं शेतकरी सन्मान निधी योजनेच्या २२ व्या हप्त्याचं वितरण करतील. सुमारे ९ कोटी ३२ लाख शेतकऱ्यांच्या बँक खात्यात १८ हजार ६४० कोटी रुपये थेट लाभ हस्तांतरण पद्धतीनं जमा होणार असल्याचं  केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी सांगितलं. या योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना आतापर्यंत ४ लाख ९ हजार कोटींहून अधिक रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झाली असून हा हप्ता दिल्यावर  आत्तापर्यंतची एकूण रक्कम ४ लाख २७ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त होईल, असंही चौहान यांनी सांगितलं. या दौऱ्यात प्रधानमंत्र्यांच्या हस्ते आसाममधल्या ४७ हजार ८०० कोटी रुपयांच्या विकास कामांचं लोकार्पण आणि पायाभरणी होणार आहे.

<><><><><>

राज्यात घरगुती एलपीजी गॅस सिलिंडरच्या पुरवठ्यात अडथळे निर्माण होऊ नयेत, आणि संभाव्य टंचाईच्या परिस्थितीत समन्वय साधता यावा, यासाठी राज्य शासनानं जिल्हास्तरावर विशेष समित्या स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. राज्यात एलपीजी पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी तसंच त्यावर  नियंत्रण ठेवण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे निर्देश अन्न आणि नागरी पुरवठा विभागाचे अपर मुख्य सचिव अनिल डिग्गीकर यांनी संबंधित यंत्रणांना दिले आहेत. घरगुती गॅस सिलिंडरचा पुरवठा सुरळीत होत राहील, अशी ग्वाही विभागानं दिली आहे. गेल्या सहा महिन्यांच्या तुलनेत मार्च महिन्यात अधिक प्रमाणात घरगुती गॅस सिलेंडर उपलब्ध आहेत. रुग्णालयं, शासकीय वसतिगृहं, शासकीय

शाळा-महाविद्यालयांमधल्या खानावळी, मध्यान्ह भोजन योजना, शासकीय आश्रमशाळा आदी अत्यावश्यक सेवा देणाऱ्या संस्थांना गॅसचा प्राधान्यानं पुरवठा करण्यात येणार असून, अशा संस्थांची यादी प्रसिद्ध करणार असल्याचं राज्य शासनानं म्हटलं आहे.

<><><><><>

पूर्वप्राथमिक शाळेत प्रवेशासाठी प्रवेश परीक्षा घेऊ नये यासाठी सरकार नियम करणार असून खासगी बालवाड्यांच्या नोंदणीसाठी एक अधिनियम प्रस्तावित असल्याचं शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी आज विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितलं. या अधिनियमाचा उद्देश नोंदणी, नियमन आणि गुणवत्ता सुनिश्चित करणं हा असून आगामी शैक्षणिक वर्ष सुरु होण्याआधी हा अधिनियम लागू केला जाईल, असं भुसे यांनी सांगितलं. या अधिनियमा अंतर्गत बालवाड्यांच्या नोंदणीसाठी सक्षम प्राधिकरणाची नेमणूक केली जाणार आहे. तसंच २० विद्यार्थ्यांसाठी एक शिक्षक असावा असा नियम लागू केला जाणार आहे. राज्यात १२ हजार ७३३ पूर्वप्राथमिक खासगी शाळा नोंदणीकृत आहेत, इतर शाळांनीही नोंदणी करावी असं आवाहन भुसे यांनी केलं.

शिक्षण हक्क कायद्याअंतर्गत घरापासून १ किलोमीटर अंतरापर्यंतच्या शाळेत प्रवेश दिला जातो, गरज असेल तर हे अंतर ३ किलोमीटरपर्यंत वाढवण्याचा विचार केला जाईल असं शिक्षणमंत्र्यांनी सांगितलं.

सर्व शिक्षण मंडळांच्या आणि माध्यमांच्या शाळांमध्ये मराठी भाषा अनिवार्य असून ज्या शाळेत मराठी शिकवली जात नाही त्या संस्थेची मान्यता रद्द केली जाईल, असंही त्यांनी सांगितलं. मनिषा चौधरी, प्रवीण दटके, विक्रम पाचपुते, अमित देशमुख यांनी याबाबत प्रश्न विचारला होता.

अतिवृष्टीग्रस्त भागातल्या विद्यार्थ्यांसाठी परीक्षा शुल्क माफीचा निर्णय सरकारनं घेतला आहे, मात्र ऑनलाईन फॉर्म भरताना परीक्षा शुल्क भरणं अनिवार्य असल्याचं कैलास पाटील यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिलं. यावर तांत्रिक अडचण दूर करायचा प्रयत्न केला जाईल, असं उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सांगितलं. अतिवृष्टी ग्रस्त भागातल्या विद्यार्थ्यांना ५० टक्के आणि विद्यार्थिनींना पूर्ण शुल्क माफ केलं असून जे कुणी शुल्क घेत असेल त्याच्यावर कारवाई केली जाईल असं आश्वासन पाटील यांनी दिलं.

विधानसभेत अर्थसंकल्पावरच्या अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा सुरू असताना संबंधित विभागाचा एकही सचिव सभागृहात उपस्थित नसल्यामुळे कामकाज काही काळ स्थगित करावं लागलं. या अनुपस्थितीबद्दल सत्ताधारी आणि विरोधी पक्षाच्या सदस्यांनी तीव्र आक्षेप नोंदवला. अध्यक्षांनी वारंवार ताकीद देऊनही अधिकारी चर्चेच्या वेळी सभागृहात उपस्थित नसतात, ही अत्यंत गंभीर बाब असल्याचं सुधीर मुनगंटीवार आणि विजय वडेट्टीवार म्हणाले. यानंतर तालिका अध्यक्ष संजय केळकर यांनी कामकाज दहा मिनिटांसाठी तहकूब केलं.

**<><><><><>**

शिक्षण शुल्कात सवलत देणाऱ्या योजनेअंतर्गत विद्यार्थिनींना प्रवेश नाकारणाऱ्या राज्यातल्या महाविद्यालयांविरोधात कारवाई केली जाईल असं उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी आज विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासादरम्यान सांगितलं. उच्च शिक्षणात महिलांचा सहभाग वाढवण्यासाठी, व्यावसायिक अभ्यासक्रमाला प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थिनींना शिक्षण शुल्क माफ करण्याचा निर्णय दोन वर्षांपूर्वी घेण्यात आल्याचं ते म्हणाले.

**<><><><><>**

सामाजिक न्याय विभागामार्फत सावित्रीबाई फुले शिष्यवृत्तीअंतर्गत अनुसूचित जातीच्या शालेय विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या शिष्यवृत्तीच्या रकमेत वाढ करायचा निर्णय अधिवेशन काळात घेऊ, या वर्षापासून ही वाढीव शिष्यवृत्ती लागू होईल, असं आश्वासन सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांनी आज विधानपरिषदेत दिलं.

**<><><><><>**

राज्य सरकारनं आठ कंपन्यांबरोबर नुकत्याच केलेल्या सामंजस्य करारांतर्गत, नाशिक जिल्ह्यात दिंडोरी इथं लिक्विड मेडिकल ऑक्सिजन आणि औद्योगिक वायू उत्पादन केंद्र उभारलं जाणार आहे. यामध्ये एसीई गॅसेस टेक्नॉलॉजीज इंडिया ही कंपनी ७५० कोटी रुपयांची गुंतवणूक करणार आहे. या प्रकल्पाची दिवसाला सुमारे ३०० टन लिक्विड मेडिकल ऑक्सिजन आणि इतर औद्योगिक वायूचं उत्पादन करण्याची क्षमता असेल. या प्रकल्पाची उभारणी दोन टप्प्यांत होणार आहे.

**<><><><><>**

रत्नागिरी जिल्ह्यात काल रात्री भूकंपाचा सौम्य धक्का बसला. रिख्टर स्केलवर त्याची तीव्रता २ पूर्णांक ८ दशांश एवढी होती. भूकंपाचा केंद्रबिंदू जमिनीखाली १० किलोमीटरवर होता. रत्नागिरी आणि लांजा तालुक्याच्या काही भागांमध्ये हा धक्का जाणवला.

**<><><><><>**

धाराशिव जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदासाठी आज निवडणूक होत आहे. यावेळी अध्यक्षपद हे सर्वसाधारण प्रवर्गातल्या महिला उमेदवारासाठी राखीव आहे. भारतीय जनता पार्टी हा जिल्हा परिषदेत सर्वाधिक १९ जागा मिळवून मोठा पक्ष ठरला आहे .

**<><><><><>**

त्र्यंबकेश्वर मंदिर परिसरात एका भाविकाला मारहाण झाल्या प्रकरणाची न्यायालयीन चौकशी करण्याचे आदेश नाशिक जिल्हा आणि सत्र न्यायालयानं दिले आहेत. या प्रकरणाची स्वतंत्रपणे चौकशी करण्याचे आणि येत्या ७ दिवसांमध्ये अहवाल सादर करण्याचे निर्देश न्यायालयानं दिले आहेत. त्र्यंबकेश्वर मंदिर परिसरात गेल्या १ मार्च रोजी एका भाविकावर झालेल्या मारहाणीचा व्हिडीओ समाज माध्यमावर प्रसारित झाला होता.

**<><><><><>**

राज्यात येत्या १७ ते २० मार्च दरम्यान अवकाळी पावसाची शक्यता आहे. या काळात दुपारनंतर हवामान ढगाळ होऊन विजांचा कडकडाट आणि मेघगर्जनेसह वादळी पाऊस पडू शकतो. काही ठिकाणी गारा पडण्याची शक्यता आहे.

सध्या रब्बी पिकांची काढणी सुरू असल्याने शेतकऱ्यांनी काढणी केलेलं पीक सुरक्षित ठिकाणी साठवून किंवा झाकून ठेवण्याची व्यवस्था करावी. तसंच वादळी वारे, पाऊस आणि संभाव्य गारपीटीपासून पिकांचं नुकसान टाळण्यासाठी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असं आवाहन कृषी विभागाने केलं आहे.

**//<><><><><>//**